महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. MPSC-११०२३/१/२०२१-IT दिनांक:- २६ ऑगस्ट, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० - प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करण्यात येत असलेल्या अडचणींबाबतची वस्तुस्थिती**

**संदर्भ:- दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रचलित पद्धतीनुसार आणि जाहिरात / सर्वसाधारण सूचनांनुसार परीक्षेच्या दिनांकाच्या किमान ७ दिवस अगोदर उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाते. त्यानुसार आयोगाकडून विषयांकित परीक्षेकरीता दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १२.२५ वाजता आयोगाच्या दोन्ही संकेतस्थळांवर प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याकरीता वेबलिंक उपलब्ध करून देण्यात आली व त्याप्रमाणे संदर्भिय प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून घेण्यासाठी उमेदवारांकडे साधारणपणे १० दिवसांचा कालावधी उपलब्ध असला तरी प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिल्यानंतर सुरुवातीच्या काही तासातच उमेदवारांनी मोठ्या संख्येने एकाच वेळी ते डाऊनलोड करण्याचा प्रयत्न केला. परिणामी, संबंधित सर्व्हरवर अचानक ताण वाढल्याने उच्च क्षमता असूनही सदर सर्व्हर संथ झाला, त्यामुळे काही वेळाकरीता उमेदवारांची गैरसोय झाली. तथापि, पहिल्या दिवशी साधारणपणे १५,००० उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून घेता आली आहेत.

२. विषयांकित परीक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करण्यामध्ये उमेदवारांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत, याकरीता परीक्षेच्या नियोजित दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी अतिरिक्त सर्व्हरद्वारे प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, सर्व उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध होतील, याची आयोगाकडून आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात येत आहे. यास्तव, उमेदवारांनी कोणत्याही अफवा, विविध समाज माध्यमातून दिली जाणारी अनधिकृत व चुकीची माहिती यांना बळी न पडता, आयोगाच्या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

३. परीक्षेच्या दिनांकापर्यंत प्रवेश प्रमाणपत्र मिळण्यात उमेदवारांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in व/अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर किंवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग